पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १३

**सभावृत्तांत**

दिनांक - **०६/०२/२०१५** वेळ - सकाळी **१२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **०६/०२/२०१५** रोजी सकाळी **१२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) **मा. पालांडे सुजाता सुनिल – सभापती**
२) मा. वाबळे संजय मल्हारराव
३) मा. सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
४) मा. वाघेरे प्रभाकर नामदेव
५) मा. सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
६) मा. मासुळकर समीर मोरेश्वर
७) मा. विमलताई सुरेश जगताप

याशिवाय मा.गावडे - सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डोईफोडे, मा.कुलकर्णी - सहा.आयुक्त, मा.गलबले - कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) अशुध्द जल उपसा केंद्र, रावेत येथे टप्पा क्र.३ व ४ योजनेअंतर्गत अतिरिक्त सर्ज अरेस्टर यंत्रणा बसविणे व अनुषंगिक कामे करणेबाबत...

विषय क्र.३) निविदा क्र.११/१७ सन २०१२-१३ या कामातून स्थापत्य विषयक कामाची दुरुस्ती करुन त्यास मंजूरी मिळणेबाबत - मा.मंदाकिनी ठाकरे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) मनपाचे वाय.सी.एम.हॉस्पिटलमध्ये बॅक ऑफ बडोदाचे एटीएम चालू करणेबाबत - मा.संजय वाबळे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) पिंपरी येथील अहिल्याबाई होळकर पुतळयासाठी चौथरा व मेघडंबरी उभारणेबाबत - मा.मंदाकिनी ठाकरे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) प्रभाग क्र.७ च-होली येथील पुणे-आळंदी रस्ता (च-होली फाटा) नियोजित पुलापर्यंत (इंद्रायणी नदी) विकास आराखडयातील रस्ता विकसित करणे (निविदा क्र.३५/१ - २०१३-१४) या कामाचे ठिकाणामध्ये बदल करणेबाबत - मा.मंदाकिनी ठाकरे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) जलक्षेत्र क्र.ड/ काळेवाडी मध्ये पाण्याच्या टाकीचे वितरण व्यवस्थेत सुधारणा करणेसाठी डिझाईननुसार नविन पाईपलाईन पुरविणे व टाकणेचे कामास सुधारीत मान्यतेबाबत - मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमलताई जगताप यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत - मा.मंदाकिनी ठाकरे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) वाढीव खर्चास मान्यता मिळणेबाबत - मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमलताई जगताप यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) कामाच्या जागेत बदल करणेबाबत - मा.समीर मासुळकर, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक १९/१२/२०१४ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक ९ ) चा सभावृत्तांत कायम करणेबाबतचा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक १६/०१/२०१५ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक ११ ) चा सभावृत्तांत कायम करणेबाबतचा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा असे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक : ७७ विषय क्रमांक : १

दिनांक : ०६/०२/२०१५ विभाग : आकाशचिन्ह व परवाना

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.शकुंतला बनसोडे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/७/कावि/८०२/२०१४, दि.३०/१२/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३, ३७६ व उपविधीनुसार उद्योगधंदा व्यवसाय, साठा परवाने देण्यात येतात. या व्यावसायिकांकडून परवाना फी प्रती वर्षी वसुल करणेत येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ चे तरतूदीस अधिन राहून प्रति वर्षी परवाना फी चे दर निश्चित करण्यात येतात. त्यानुसार प्रचलित सन २०१४-१५ दरामध्ये १०% दरवाढ सर्व उपरोक्त तिन्ही प्रकारच्या परवान्यांसाठी करणेत येऊन सन २०१५-१६ साठी प्रस्तावित दर दर्शविणारे उद्योगधंदा परवाना फी साठी प्रपत्र “अ”, व्यवसाय परवाना फी साठी प्रपत्र “ब”, व साठा परवाना फी साठी प्रपत्र “क” प्रमाणे दर निश्चितीस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक : ७८ विषय क्रमांक : २

दिनांक : ०६/०२/२०१५ विभाग : विद्युत

सुचक : मा.संजय वाबळे अनुमोदक : मा.समीर मासुळकर

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.ज.शु.के./वि/४७/२०१५, दि.०५/०२/२०१५

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

अशुध्द जल उपसा केंद्र, रावेत येथे टप्पा क्र. ३ व ४ योजने अंतर्गत अतिरिक्त सर्ज अरेस्टर यंत्रणा बसविणे व अनुषंगिक कामे करणेकामी येणारा अंदाजे र.रु.१,५४,४०,०००/- ( अक्षरी र.रु.एक कोटी चौप्पन्न लाख चाळीस हजार फक्त ) चे पूर्वगननपत्रकास व त्याप्रमाणे काम करणेस मान्यता मिळणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ७९ विषय क्रमांक : ३

दिनांक : ०६/०२/२०१५

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.शकुंतला बनसोडे

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.४३ पिंपरीनगर येथे आवश्यकतेनुसार विविध ठिकाणी संडास व मुता-या बांधणीचे कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत. तथापि उपरोक्त कामास पुर्ण साईट उपलब्ध नसल्याने याच कामातून या प्रभागातील कॉंक्रीट पेव्हींग, पेव्हींग ब्लॉक व इतर स्थापत्य विषयक कामांची दुरुस्ती करुन घेण्यास व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.१०,००,०००/- (अक्षरी र.रु.दहा लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८० विषय क्रमांक : ४

दिनांक : ०६/०२/२०१५

सुचक : मा.संजय वाबळे अनुमोदक : मा.शकुंतला बनसोडे

संदर्भ : मा.संजय वाबळे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव -

मनपाचे वाय.सी.एम.हॉस्पिटल मधील बहुतांशी कर्मचा-यांची बँक खाती ही बँक ऑफ बडोदा, पिंपरी येथील मनपा मुख्य प्रशासकीय इमारत येथील शाखेत आहेत. त्यामुळे तेथील कर्मचा-यांना बँक विषयक कामकाजासाठी पिंपरी येथील शाखेमध्ये यावे लागते. त्यामुळे तेथील कर्मचा-यांची गैरसोय होत आहे. वाय.सी.एम.हॉस्पिटल येथील कर्मचा-यांचे सोयीचे दृष्टीने वाय.सी.एम.हॉस्पिटल येथे बँक ऑफ बडोदाचे एटीएम चालू करणेबाबत वाय.सी.एम. हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिक्षक व पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघाची मागणी आहे. बँक ऑफ बडोदा ही राष्ट्रीयकृत बँक असून भारत सरकारचा उपक्रम आहे. पिंपरी चिंचवड मनपाचे बहुतांशी आर्थिक व्यवहार याच बँकेमार्फत हाताळले जातात. तरी मनपाचे कामकाजाचे सोयीचे दृष्टीने वाय.सी.एम.हॉस्पिटल आवारात बँक ऑफ बडोदा या बँकेस विना निविदा थेट पध्दतीने १० वर्ष कालावधीसाठी मनपा नियमानुसार येणारे भाडे दराने एटीएम सेंटर चालू करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच मनपाची सर्व क्षेत्रीय कार्यालये, आवश्यक दवाखाने, मनपाच्या सर्व शाळा व इतर विभागीय कार्यालयांमध्येही आवश्यकतेनुसार वाय.सी.एम.हॉस्पिटलचे धर्तीवर बँक ऑफ बडोदाचे एटीएम सुरु करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : ८१ विषय क्रमांक : ५

दिनांक : ०६/०२/२०१५

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.शकुंतला बनसोडे

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव -

मनपा परिसरात बस टर्मिनल / ट्रान्सफर स्टेशन विकसित करणे अंतर्गत निगडी येथे दापोडी ते निगडी या बी.आर.टी.एस.कॉरीडॉरवर बस टर्मिनल विकसित करणेचे काम निविदा क्र.३०/१-२०१३-१४ चालू असून सदर कामाच्या होणा-या बचतीमधून पिंपरी येथील अहिल्याबाई होळकर पुतळयासाठी चौथरा व मेघडंबरी उभारणेबाबत मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८०४४ दि.२५/०८/२०१४ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदर कामासाठी र.रु.१०,०४,०००/- इतका खर्च अपेक्षित असून तो सध्या चालू असलेल्या निगडी येथील बस टर्मिनल विकसित करणेच्या ( निविदा क्र.३०/१- २०१३-१४) कामाच्या बचतीमधून करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८२ विषय क्रमांक : ६

दिनांक : ०६/०२/२०१५

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.शकुंतला बनसोडे

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे इ क्षेत्रीय कार्यालयाच्या स्थापत्य विभागामार्फत प्रभाग क्र.७ च-होली येथील पुणे - आळंदी रस्ता (च-होली फाटा) नियोजित पुलापर्यंत (इंद्रायणी नदी) विकास आराखडयातील रस्ता विकसित करणे (निविदा क्र.३५/१ - २०१३/१४) या कामाचे निविदा काढण्यात आलेली आहे. सदर रस्त्याच्या जागेतील मिळकतधारकांनी विकास आराखडयातील रस्त्यामध्ये बदल केल्याने रस्त्याची जागा मनपास ताब्यात देणेबाबत अडवणूक केल्याने ठेकेदारास साईट उपलब्ध होत नाही. सदरचे काम काळजेवाडी ते च-होली गावापर्यंतचा १८.०० मी. डी.पी.रस्ता रुंदीकरण करणे व च-होली फाटा ते दत्तनगर (काळीभिंत) पर्यंतचा जाणारा १८.०० मी. डी.पी.रस्ता रुंदीकरण करणे या दोन रस्त्याच्या कामाच्या ठिकाणी बदल करणेस व तरतूदीमध्ये वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८३ विषय क्रमांक : ७

दिनांक : ०६/०२/२०१५

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.विमलताई जगताप

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमलताई जगताप यांचा प्रस्ताव -

जलक्षेत्र क्र.ड/ काळेवाडी मध्ये पाण्याच्या टाकीचे वितरण व्यवस्थेत सुधारणा करणेसाठी डिझाईननुसार नविन पाईपलाईन पुरविणे व टाकणे या कामास र.रु.५०,००,०००/- (अक्षरी र.रु.पन्नास लाख फक्त) पर्यंतचे सुधारित मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८४ विषय क्रमांक : ८

दिनांक : ०६/०२/२०१५

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.शकुंतला बनसोडे

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे, मा.शकुंतला बनसोडे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२८ मध्ये डॉ.हेगडेवार क्रीडासंकुलामधील स्केटींग ग्राऊंड अच्छादीत करणे व प्रेक्षक गॅलरी बांधणे निविदा क्र.४/३० निविदा दर २१.२१% कमी निविदा र.रु.२२,४०,८९६/- असून सदर कामास लागणारा खर्च र.रु.४९,०८,०००/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख आठ हजार फक्त) इतका आहे. तरी सदर वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८५ विषय क्रमांक : ९

दिनांक : ०६/०२/२०१५

सुचक : मा.मंदाकिनी ठाकरे अनुमोदक : मा.विमलताई जगताप

संदर्भ : मा.मंदाकिनी ठाकरे, मा.विमलताई जगताप यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२८ येथे डांबरी रस्ते, आकस्मित रस्ते, दुरुस्तीची कामे तातडीने करणेकामी निविदा क्र.४/७२ निविदा दर २१.२१% कमी निविदा र.रु.१४,००,५६१/-, असा असून सदर कामास लागणारा खर्च र.रु.४९,०७,८९०/- (अक्षरी र.रु.एकोणपन्नास लाख सात हजार आठशे नव्वद फक्त) इतका आहे. तरी सदर वाढीव खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक : ८६ विषय क्रमांक : १०

दिनांक : ०६/०२/२०१५

सुचक : मा.समीर मासुळकर अनुमोदक : मा.मंदाकिनी ठाकरे

संदर्भ : मा.समीर मासुळकर, मा.मंदाकिनी ठाकरे यांचा प्रस्ताव -

च-होली फाटा ते इंद्रायणी पुलापर्यंत दाभाडे वस्ती नियोजित रस्त्यावर सी.डी.वर्क्स बांधणे. निविदा क्र.३२/२२ - २०१३-१४ या कामाची साईट उपलब्ध होत नसल्यामुळे सदरच्या कामाऐवजी च-होली येथील नदी किनारच्या १८ मी. नियोजित रस्त्याची रिटेनिंग वॉल बांधणे व कोतवालवाडी नाला व तापकीरवस्ती येथील नाला बांधणे ही कामे सदर निविदेमधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **पालांडे सुजाता सुनिल** )
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/ ९१ /२०१५
दिनांक : १०/०२/२०१५



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\172.16.0.152\e\e drive\Nagersachiv1\Vidhi-14-15\proceeding 10_Vidhi.doc